*(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)*

*NAVJYOT / Vol. IX / Issue – II* *ISSN 2277-8063*

# महाराष्ट्रतील स्त्री चळवळ सद्य परिस्थितीचे स्वरुप

**प्रा. डॉ. विलास भारतराव बनसोडे**

दादापाटील राजळे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, आदिनाथनगर,
ता. पाथर्डी, जि. अहमदनग ८९७५४६१२९९

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्रजी शिक्षण आणि युरोपमधील सुधारकांकडून प्रेरणा घेऊन महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेला गती मिळाली. महाराष्ट्रातील या सामाजिक सुधारणाच्या चळवळीत न्या. रानडे, गोपाल गणेश आगरकर, महात्मा फुले, सावित्रीबाई फुले अशा अनेकांनी आपले योगदान दिलेले आहे. या प्रभुतींनी एकुणच सकस, सक्षम आणि प्रगत सामाज निर्मितीवर भर दिला. 'इंग्रजी विद्येच्या आगमनामुळे भारतीय प्रबोधनाला सुरुवात झाली. जुनी विद्या व नवी विद्या यांच्यांतील फरक लोकहितवादी गोपाळ हरि देशमुख यांनी विशद केला. सुधारकाग्रणी गोपाळराव आगरकर यांनी सर्व पातळयांवर समानतेचा आग्रह धरला, परंतु हे प्रबोधन उच्चवर्णीयापुरतेच मर्यादित होते. स्त्रीशूद्रातिशूद्र यांच्यापर्यत या सुधारणा नेण्याचे श्रेय महात्मा ज्योतीबा फुले यांना जाते'[१]

स्त्रीचळवळीमुळे महिला सशक्तीकरण हा जागतिक स्तरावरील महत्वाचा विषय ठरत आहे. त्याचे कारण हे तसेच आहे. जगातील जवळपास प्रत्येक देशाच्या समाजव्यवस्थेने स्त्रीयांना उपेक्षित, वंचित आणि दूर्लक्षित ठेवले आहे. जगातील सर्वाधिक पिडीत आणि अत्याचारित वर्ग या महिला आहेत. धार्मिकबांबीचा आधार घेऊन स्त्रियांना स्वतंत्र व्यक्तिमत्व, प्रतिष्ठा व मानवी हक्क नाकारले गेले.

ग्रीक तत्वेत्ता तथा राज्यशास्त्राचा जनक ॲरिस्टॉटल याने राज्यसंस्थेचे अंतिम ध्येय मानवाला सर्वश्रेष्ठ जीवनाची प्राप्ती करुन देणे, हेच असल्याचे प्रतिपादन केले. ॲरिस्टॉटलचा गुरु प्लेटो हा महिला सशक्तीकरणचा मोठा समर्थक होता. महिला सबलीकरणाच्या किंवा स्त्री–पुरुष समानतेच्या उत्तेजनार्थ एक मजेशीर विधान केले होते. "घराचे संरक्षण कुत्रा ज्या कार्यक्षमतेने करतो तेवढयाच कार्यक्षमतेने कुत्री सुध्दा करु शकते."[२]

प्लेटो म्हणतो की, स्त्रियांकडे दूर्लक्ष करणे म्हणजे समाजातील पन्नास टक्के मनुष्यबळ गमावण्यासारखे आहे. यांचा एकूणच विपरित परिणाम हा विकास प्रक्रिया मदांवण्यावर होणार हे मात्र निश्चित. ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. आठ मार्च रोजीच महिला दिन का साजरा केला जातो? याचे कारण, अमेरिकेतील न्यूयॉर्क शहरातील हाजारो महिला कामगारांनी योग्य वेतन आणि मतदानाचा अधिकार या मागण्यासाठी निदर्शने केली. महिलांच्या मानवी हक्कासाठी स्त्रियांनी केलेल्या दिवसाची आठवण म्हणून ८ मार्च हा दिवस जागतिक महला दिन म्हणून साजरा केला जातो.

म. फुले यांच्या पुढाकाराने महाराष्ट्रात सामाजिक सुधारणेची चळवळ खऱ्यार्थाने जोमात सुरू झाली. सामाजिक चळवळीतील अनेक चळवळी फुल्यांच्या प्रेरणेतून सुरु झाल्या. स्त्रीचळवळ, दलित चळवळ, साहित्य चळवळ तसेच त्याचे चळवळीतील सहाकरी रावबहादूर मेघाजी लोखंडे यांनी भारतातील पहिली कामगारांची संघटना फुले यांच्या प्रेरणेतून सुरु केली.

स्त्रिांयाना मानवी हक्कांची प्राप्ती व्हावी, या साठी भारतात मजबूत संघटनात्मक बांधणी झोलेली दिसून येते. त्यात जनवादी महिला संघटना, भारतीय महिला फेडरेशन, दलित महिला फोरम, महाराष्ट्र महिला व्यासपीठ, महिला दक्षता समिती, महिला हक्क संरक्षण समिती, नारी समता मंच, समाजवादी महिला सभा, श्रमिक महिला मोर्चा, स्त्री मुक्ती संघटना, यंग वुमेन्स ख्रिश्चन असोशिएशन अशा अनेकानेक संघटना महिला वर्गाचे हितसंबंध जोपासतांना दिसतात.

महाराष्ट्रात सर्वसाधारणपणे ८० च्या दशकात स्त्रीमुक्ती चळवळीने जोर धरला. हादरून टाकणाऱ्या काही घटना पुण्यातल्या मध्यमवर्गीय घरात घडल्या आणि स्त्रियांवरील कुंटुंबातर्गत अत्याचार ही कळीचा प्रश्न बनला. 'बायजा', 'स्त्री' सारखी मासिके ही स्त्रीमुक्तीची मुखपत्रे बनली. मोलकरीन संघटनेपासून ते जनवादी महिला संघटनेपर्यंत अनेक स्त्री–संघटना कृतीशील

झाल्या. परित्यक्ता, जबानी तलाकपीडीत स्त्रियांचे मेळावे झाले. यापासून ते स्त्रियांच्या स्वच्छतागृहांपर्यंत अनेक प्रश्न या संघटनांनी पुढे आणले. अनेक वेळा कळीच्या प्रश्नांवर वेगवेगळया स्त्री संघटना एकत्रित येऊन काम करु लागल्या. त्यातून कौटुंबिक अत्याचारापासून, स्त्री—भ्रूणहत्येपासून कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळापासून संरक्षण देण्याचा प्रयत्न करणारे नवे कायदे निर्माण झाले.[३]

महाराष्ट्राबाबत नेहमी पुरोगामी असे बिरूद लावले जाते. मिरवले जाते. छत्रपती शिवराय ते फुले, शाहू, आंबेडकर, सावित्रीबाई फुले आदींची नावे घेऊन महाराष्ट्र पुरोगामी असल्याचा दावा केला जातो. आपले राज्य हे इतर प्रदेशांना नेतृत्व देणारा आहे. असे एकीकडे म्हणतोत, मात्र स्त्रीप्रश्नांबाबतीत फार काही समाधानकारक परिस्थिती आहे. असे चित्र पुरोगामी महाराष्ट्राचे दिसून येत नाही. आजही स्त्रिभ्रणहत्या होत आहेतच, स्त्रियांना शिक्षणात दुय्यमत्व दिले जाते., कौटुंबिक हिंसाचार, बालविवाह, वाढतच आहेत. आजही स्त्रियांना कौटुंबिक जबाबदाऱ्यात जखडून टाकले जाते.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर लागू केलेल्या लॉकडॉऊनच्या कालावधीत स्त्रियांवर कौटुंबिक हिसांचार झालेले हाजारो गुन्हे नोंदविण्यात आलेले आहेत. हे कशाचे घोतक आहे. पुरुषप्रधान मानसिकतेचे.[४]

आज ही सुशिक्षित स्त्रियां सोवळे—ओवळे यांना महत्व देतांना दिसतात. पुण्यातील उच्चभ्रुवर्गातील श्रीमती खोत उच्चपदस्थ अधिकारी यांची प्रतिगामी मानसिकता अवघ्या महाराष्ट्राने अनुभवली. समस्त स्त्रीवर्गांच्या अत्याचाराचे, शोषणाचे मूळ हे धार्मिक गुलामगिरीच्या मानसिकतेत दडलेले दिसून येते. आजही उच्चविद्याविभूषित, उच्चपदस्त व स्वतःला आधुनिक म्हणणारी स्त्री ही. व्रत—वैकल्य, उपास, नवस, मुहुर्त आदी अंधविश्वासांना विवेक गहाण ठेऊन अतोनात महत्व देते. ज्या सावित्रीबाईनी तत्कालीन सनातन्याचा विरोध पत्कारुन, बंड करुन स्त्रीशिक्षणाची संधी मिळवून दिली. त्या मातेविरुध्दचा हा कृतघ्नपणा नव्हे काय? या बाबतीत आत्मपरीक्षण करण्याची आवश्यकता आहे.

अशा परिस्थितीत ही काही सावित्रीच्या लेकी महाराष्ट्रात सावित्रीचा वारसा चालविताना दिसतात. शनी चौथ्याऱ्यावरील स्त्रियांना प्रवेश मिळावा म्हणून तृप्ती देसाई यांनी जो लढा दिला. तेव्हा सावित्रीच्या लेकी आहेत. याची प्रचिती येते. शनी चौथ्याऱ्यातील प्रकरणात अनेक सेलिब्रेटिजनीं सनातन्याची भूमिका उचलून धरली. उघड समर्थन दिले. यात महिलावर्ग आघाडीवर होता. याचा अनुभव महाराष्ट्रातील नागरिकांनी घेतलेला आहे.

दुसरे ताजी घटना, महाराष्ट्रातील अलीकडेच निवृत्ती महाराज इंदोरीकर यांनी आपल्या कीर्तनातून 'सम तारखेला स्त्री व पुरूष यांचा शरीरसंबंध झाला तर, त्यातून गर्भधारणा होऊन मुलगा होतो आणि विषम तारखेला मुलगी होते. अशुभ वेळेला असा शरीरसंबंध झाला तर होणारी संतंती ही नालायक व खलप्रवृत्तीची जन्मते.'

इंदोरिकराच्या उपरोक्त वाक्यावरुन संबंध महाराष्ट्रात वादंग सुरु झाले. समाजाच्या सर्वस्तरातून राजकारणी, समाजसेवक, विचारवंत, लेखक आणि कीर्तनकारांकडून त्यांचे समर्थनात आणि विरोधी अशा प्रतिक्रिया दिल्या. काहींना इंदोरीकरांचे विधान हे अंधश्रध्देला उत्तेजना देणारे आहे. तर दुसरीकडे इंदोरीकरांचे चाहते वी सपोर्ट इंदोरीकर असे लिहलेले फलक घेऊन मौर्चे काढताना साऱ्या महाराष्ट्राने पाहिले. एके ठिकाणी तर त्यांचा दुगधाभिषेक करण्यात आला.

'मानसशास्त्रीय विचार करता नामवंताच्या सेलिब्रिटीज जनमनावरील प्रभावाबाबत मानसशास्त्र असे सांगते की, नामवंताची प्रत्येक गोष्ट त्यांचा प्रत्येक शब्द, त्यांची चाहती असणाऱ्या सामान्य जनतेस अनुकरणीय वाटतो. कारण अशा अनुकरणातून त्यांना वैयक्तिगत यशस्वीतेची आशा दिसते.'[५]

इंदोरीकर प्रकरणावरुन एक बाब मात्र महाराष्ट्रानी प्रकर्षानेअनुभवली ती म्हणजे आपल्या समाजाची पुरूषप्रधान मानसिकता अजूनही जीवंत आहे. दुसरी गोष्ट म्हणजे समाज विवेक हारवत नाही, तर गहाण ठेवत आहेत. याची प्रचिती येते.

सरकारी पातळीवर महिला आयोगाच्या माध्यमातून स्त्री सशक्तीकरणाचा प्रयत्न केला जातो. 'ती' च्या हाती पाळण्याची दोरी...... आता महिला दिनाचे औचित्यसाधून महाराष्ट्र शासनाने **'ती' च्या हाती 'एसटी'चे सारथ्य**.... दुष्ळकाग्रस्त भागातील २१३ महिलांना वाहक व चालक म्हणून प्रशिक्षण शासन सुरु करणार आहे. पोलीस दलात खाकी वर्दी परिधान करण्याची संधी मिळाली.

सर्वोच्च न्यायलयाने अलीकडेच दिलेल्या निर्णयाने भूदलात महिलांना स्थायी नियुक्ती आणि नेतृत्वाच्या पदांवर नियुक्तीची संधी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. मात्र, या सकारात्मक निर्णयानंतरही समान संधीसाठीचा लढा संपलेला नाही.......

शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च व्यासपीठ म्हणजे विद्यापीठे होय. अनेक विद्यापीठात पूर्वी स्त्री संशोधन अभ्यास केंद्र सुरु होते. हल्ली ते बऱ्याच विद्यापीठातून नाहीसे झालेले दिसून येते. असे अभ्यास केद्र पुन्हा सुरु करावेत. अशा अभ्यास केद्रांच्या माध्यमातून सावित्रीच्या लेकी तयार होतील आणि स्त्री चळावळ अधिकाधिक सशक्त होईल.

**संदर्भः**

१. डॉ. य. दि. फडके, २००६, राखीव जागांची शंभर वर्षे, सुगाबा प्रकाशन, पुणे, पृ. क्रं. १
२. शहापूरकर भूषण, पाश्चिमात्य राजकीय विचारवंत, लातूर
३. आनंद करंदीकर, महाराष्ट्रातील चळवळींची दशा आणि दिशा, लोकसत्ता, लोकरंग, रविवार, २६ एप्रिल २०२०, पृ. क्रं. ६
४. विद्युत भागवत, दै. लोकसत्ता, लोकरंग, रविवार, दि. २६ एप्रिल, २०२०, स्त्री चळवळीवरील लेख
५. ॲड. संजय भारे, विवेक हरवलेल्या समाजात, दै. लोकसत्ता, रविवार, दि. १५ मार्च २०२०, पृ. क्रं. ७